श्री व्यंकटेश महाविद्यालयामध्ये  व्याख्यानाचे आयोजन

"ग्राहक संरक्षण कायदा 1986 व 1919 यामध्ये फरक असून ग्राहक संरक्षण कायदा सुरू होण्यासाठी आधुनिक युगामध्ये ग्राहकाच्या संरक्षणाचा प्रश्न भेडसावू लागला व यानंतरच ग्राहक संरक्षण कायदा निर्माण करण्यात आला. वस्तुविनिमय पद्धतीमध्ये वस्तूंची देवाण-घेवाण होत असल्याने या पद्धतीमध्ये ग्राहकाच्या फसवणुकीचा प्रश्न निर्माण होत नव्हता आणि यामुळे पूर्वी ग्राहक संरक्षण कायद्याची आवश्यकता नव्हती. जसजशी वस्तू विनिमय पद्धती लोप पावली व चलनाद्वारे चलनविनिमय पद्धती सुरू झाल्यानंतर ग्राहकाचे प्रश्न सुरू झाले आणि म्हणून ग्राहक संरक्षण कायदा निर्माण झाला. आजच्या घडीला ग्राहक संरक्षण कायद्यामध्ये ग्राहक , तक्रारदार, ग्राहकाचे अधिकार, ग्राहक तक्रार निवारण प्रक्रिया, ग्राहक मंच भूमिका व ग्राहक संरक्षण कायद्याची कार्यपद्धती याचा समावेश केल्याने ग्राहकास सध्या न्याय प्राप्त होत आहे." असे प्रतिपादन ऍडव्होकेट अक्षय खांडेकर यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे इकॉनॉमिक्स असोसिएशनच्या वतीने ठेवण्यात आलेल्या व्याख्यानामध्ये बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने हे होते. त्यांनी ग्राहक संरक्षण कायदा व ग्राहक जागरूकता याविषयी काही उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख अतिथींची ओळख डॉ. एस. आर. ठाकर यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कुमारी प्रज्ञा हिने केले. कार्यक्रमाचे आभार श्री. एस. जी. धडके यांनी मांडले. कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारीवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

